
थोडक्यात पण महत्वाचे

मांडकीत ३० वर्षीय तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



वाल्हे : दैनिक संध्या

मांडकी (ता . पुरंदर) येथील ३० वर्षीय तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. विशाल विजय सणस असे मृत तरुणाचे नाव असून कर्जाला कंटाळून त्याने आत्महत्या केली असावी अशी प्राथमिक चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे. याबाबत पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार विशाल सणस हा शिरूर (जि.अहिल्यानगर) येथील एका कंपनीत नोकरी करत होता.मात्र कंपनीतून ब्रेक मिळाल्याने तो आपल्या मूळ गावी मांडकी येथे आला होता. रविवारी (४ ऑक्टोबर) सकाळी कुटुंबातील सदस्य शेतात कामासाठी गेले असता विशालने दुपारनंतर राहत्या घरातील छताच्या अँगलला दोरीच्या साह्याने गळफास लावून आत्महत्या केली.या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन मयताचा पंचनामा केला त्यानंतर विशालचा मृतदेह रुग्णवाहिकेतून जेजुरीच्या ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल करण्यात आला. याबाबत विराज विजय सणस (वय २७ रा. मांडकी) यांनी जेजुरी पोलीस ठाण्यात खबरी जबाब नोंदवला आहे. तर जेजुरी पोलिसांनी या घटनेची अकस्मात मयत म्हणून नोंद केली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार भाऊसाहेब भोंगळे हे करीत आहेत.

शनिवारी कृतज्ञता सन्मान सोहळा

चाकण : दैनिक संध्या

खेड तालुक्याचे आधारवड, सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सदैव धावून जाणारे आणि आपल्या कार्यातून जनमानसात वेगळी ओळख निर्माण करणारे स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे यांच्या ६ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त चाकण येथे शनिवारी (दि.१० ऑक्टोबर) कृतज्ञता पुरस्काराचे वितरण, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे यांनी खेड तालुक्याच्या विकासासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या सामाजिक, राजकीय व लोकहिताच्या कार्याची आठवण जागविण्यासाठी तसेच त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. यंदाच्या पुण्यस्मरण दिनानिमित्तही विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. चाकण येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात या पुण्यस्मरण दिनाच्या कार्यक्रमाची सुरुवात दुपारी ३ वाजता स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात येणार आहे. यावेळी त्यांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच सामाजिक व विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा 'कृतज्ञता सन्मान पुरस्कार' देऊन गौरव करण्यात येणार आहे. या सन्मान सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार असल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रसिद्ध रामायणाचार्य हभप. समाधान महाराज शर्मा यांची सुश्राव्य कीर्तन सेवा आयोजित करण्यात आली आहे. आपल्या प्रभावी वाणीतून रामायणातील प्रसंग, संस्कार, भक्ती आणि जीवनमूल्यांचा संदेश देणाऱ्या समाधान महाराजांच्या कीर्तनाचा लाभ उपस्थित भाविकांना घेता येणार आहे. या कीर्तनामुळे पुण्यस्मरण सोहळ्याला भक्तिमय वातावरणाची जोड मिळणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत अन्नदानाचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व नगरसेवक नितीन गोरे, उद्योजक विकास गोरे, दत्तात्रय गोरे, माणिक गोरे, ओंकार गोरे, निलेश गोरे, स्व.आ. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठान खेड तालुका व गोरे कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आले आहे.

कवठेमहांकाळ पूर्व भागावर दुष्काळाच्या झळा

नागज : : दैनिक संध्या

कवठेमहांकाळ तालुक्याच्या पूर्व भागात दुष्काळाचे विदारक चित्र बघायला मिळत आहे. पाण्याअभावी बागायती पिके तसेच पशुधन संकटात आहे. खरीप हंगाम पूर्णतः वाया गेला आहे. रब्बी हंगामाच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा लागली आहे. कवठेमहांकाळ तालुक्याच्या पूर्व भागात पाऊस नसल्याने बहुतांशी भागात खरिपाची पेरणी झाली नाही. पावसाअभावी विहिरी व कूपनलिका आटल्याने पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. चारा-पाण्याविना जनावरांचे हाल सुरू आहेत. यंदा कमी पावसाने निम्म्याहून अधिक क्षेत्रातील खरिपाच्या पेरण्या झाल्याच नाहीत. पण पेरणी झालेली पिकेही पाण्याअभावी वाळून गेली. कवठेमहांकाळ तालुक्याच्या पूर्व भागातील ढालगाव, चोरोची, चुडेखिंडी, जांभुळवाडी, ढोलेवाडी, दुधेभावी, शिंदेवाडी, घोरपडी, निमज, नागज, रायवाडी, केरेवाडी, शेळकेवाडी, आगळगाव, आरेवाडी, लंगरपेठ, ढालेवाडी, इरळी भागात यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले. थोड्याफार पावसावर शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या आहेत. पण ही पिके पाण्याअभावी वाळून जाण्याच्या मार्गावर आहेत. म्हैसाळ व टेंभू योजनेच्या पाण्याच्या भरोशावर शेतकऱ्यांनी वाढवलेली बागायती पिकेही धोक्यात आहेत. विजेचा खेळखंडोबा आणि सिंचन योजनांच्या पाण्याचा अनियमितपणा यामुळे बागायती पिके जगवायची कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे आहे. पाण्याअभावी जनावरांचे हाल सुरू आहेत. शेळ्या-मेंढ्यांना चारा नसल्याने चाऱ्याच्या शोधात त्यांची आतापासूनच रानोमाळ भटकंती सुरू आहे. खरीप हंगाम वाया गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडणार असल्याचे चित्र दिसत आहे. कवठेमहांकाळ तालुक्यात दुष्काळ जाहीर होणार असला तरी, दुष्काळाने होरपळलेल्या इथल्या शेतकऱ्यांना मदत मिळणार का, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच याबाबत तातडीने शासनस्तरावर निर्णय घेण्याची मागणी होऊ लागली आहे. दुष्काळाचे चित्र विदारक बनत चालल्याने या भागाला वरदान ठरणारे दुधेभावी, लंगरपेठ आणि बसाप्पाचीवाडी तलाव सिंचन योजनेच्या पाण्याने भरून घेण्याची आवश्यकता आहे. श्रेयवादाच्या राजकारणात स्वतःची पोळी भाजून घेणाऱ्या इथल्या राजकारण्यांना दुष्काळग्रस्तांची आस्था वाटणार की नाही, हे आगामी काळात स्पष्ट होईल, तशी प्रतिक्रिया देखील उमटत आहे.

समांतर पुलावरील खड्डे बुजवण्यास सुरुवात



सांगली : दैनिक संध्या

येथील आयर्विन पुलाच्या समांतर पुलावरील खड्डे बुजवण्याच्या कामाला अखेर सुरुवात झाली आहे. पुलावरील खड्ड्यांमुळे वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यानंतर खड्डे बुजवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. समांतर पुलावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडल्याने वाहनधारकांना कसरत करत प्रवास करावा लागत होता. काही महिन्यांपूर्वीच रस्त्याचे काम करण्यात आले असतानाही पुन्हा खड्डे पडल्याने वाहनधारकांतून नाराजी व्यक्त होत होती. अखेर खड्डे बुजवण्याचे काम सुरू झाल्याने वाहनधारकांना दिलासा मिळाला आहे. नुसते खड्डे बुजवून उपयोग नाही. खड्डे पुन्हा पडणार नाहीत, यासाठी कामाचा दर्जा आणि रस्त्याची गुणवत्ता याकडेही प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. काही महिन्यांतच पुन्हा रस्ता खराब होण्याची वेळ येऊ नये, अशी अपेक्षा वाहनधारकांतून व्यक्त होत आहे.

डेंग्यूचा डास चावला तर कोणती लक्षणे दिसतात ?

वेळीच निदान करा, जीवघेणा धोका टाळा ! युवा क्रांतीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. राजेश्वर हेंद्रे यांचे नागरिकांना आवाहन



■ मुंबई(दै. संध्या)

सध्या बदलते हवामान, वाढता उकाडा आणि ठिकठिकाणी साचणारे पाणी यामुळे डासांची उत्पत्ती वाढण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत डेंग्यूबाबत नागरिकांनी अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. डेंग्यू हा विषाणूजन्य आजार असून संक्रमित एडीस डासाच्या चाव्यामुळे त्याचा प्रसार होतो. वेळेत निदान व योग्य उपचार न मिळाल्यास काही रुग्णांमध्ये डेंग्यू गंभीर स्वरूप धारण करून जीवघेणा ठरू शकतो.युवा क्रांतीचे उपाध्यक्ष डॉ. राजेश्वर हेंद्रे यांनी नागरिकांना डेंग्यूची सुरुवातीची लक्षणे ओळखून वेळ न दवडता वैद्यकीय तपासणी करून घेण्याचे आवाहन केले आहे.

डेंग्यूची प्रमुख लक्षणे कोणती ?

डेंग्यूची लक्षणे साधारणपणे संक्रमित डास चावल्यानंतर ४ ते १० दिवसांनी दिसू शकतात.अचानक येणारा तीव्र ताप, डोकेदुखी, डोळ्यांच्या मागे दुखणे, अंगदुखी, स्नायू व सांधेदुखी, मळमळ, उलट्या आणि अंगावर पुरळ ही प्रमुख लक्षणे आहेत.तापासोबत अशी लक्षणे दिसत असतील तर केवळ घरगुती उपचारांवर अवलंबून न राहता डॉक्टरांचा सल्ला घेऊन आवश्यक रक्त तपासणी करून घेणे महत्त्वाचे आहे. रक्त तपासणीद्वारे डेंग्यूचे निदान निश्चित करण्यास मदत होते.

ताप उतरला म्हणजे धोका टळला असे समजू नका!

डेंग्यूमध्ये सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ताप कमी झाल्यानंतरही काही रुग्णांमध्ये गंभीर अवस्था सुरू होऊ शकते. त्यामुळे ताप उतरल्यावरही पुढील २४ ते ४८ तास विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. पोटात तीव्र दुखणे, सतत उलट्या होणे, नाक किंवा हिरड्यांतून रक्त येणे, रक्ताची उलटी, काळसर शौच, प्रचंड अशक्तपणा, अस्वस्थपणा, झोप येणे किंवा गोंधळाची अवस्था, श्वास घेण्यास त्रास, हात-पाय थंड व फिकट पडणे अशी धोक्याची लक्षणे दिसल्यास रुग्णाला तातडीने रुग्णालयात दाखल करावे.

तातडीने काय करावे?

डेंग्यूची शंका असल्यास रुग्णाने पुरेशी विश्रांती घ्यावी आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पुरेसे द्रवपदार्थ, ओआरएस, सूप किंवा इतर योग्य द्रव घ्यावेत. ताप व वेदनांसाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने पॅरासिटामॉल वापरला जातो. मात्र ॲस्पिरिन, आयबुप्रोफेन किंवा इतर NSAID औषधे स्वतःहून घेऊ नयेत, कारण रक्तस्रावाचा धोका वाढू शकतो.पपईच्या पानांचा रस, गिलोय इत्यादी पारंपरिक उपायांचा उल्लेख अनेक ठिकाणी केला जातो.

पपईच्या पानांच्या अर्कामुळे प्लेटलेट्समध्ये वाढ होण्याची शक्यता दर्शविणारे काही अभ्यास आहेत; मात्र त्याचा डेंग्यूवरील सिद्ध उपचार म्हणून स्वीकार करण्यासाठी उच्च दर्जाचे पुरावे अद्याप अपुरे आहेत. त्यामुळे अशा उपायांवर अवलंबून राहून वैद्यकीय तपासणी किंवा रुग्णालयातील उपचार पुढे ढकलू नयेत.

डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी घराभोवती पाणी साचू न देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पाण्याच्या टाक्या, बादल्या, कुंड्या, टायर, नारळाच्या करवंट्या, प्लास्टिकच्या वस्तू आदी ठिकाणी पाणी साचले असल्यास ते नियमितपणे रिकामे करून परिसर स्वच्छ ठेवावा. घरातील पाण्याची भांडी झाकून ठेवावीत. दिवसा चावणाऱ्या एडीस डासापासून संरक्षणासाठी पूर्ण अंग झाकणारे कपडे, मच्छर प्रतिबंधक आणि आवश्यकतेनुसार मच्छरदाणीचा वापर करावा.

"डेंग्यूमध्ये सर्वात महत्त्वाचे म्हणजे लक्षणांकडे दुर्लक्ष न करणे. अचानक ताप, अंगदुखी, डोकेदुखी, डोळ्यांच्या मागे दुखणे किंवा उलट्या यांसारखी लक्षणे दिसल्यास वेळेत डॉक्टरांकडे जावे. विशेषतः ताप कमी झाल्यानंतर धोक्याची लक्षणे दिसल्यास विलंब न करता रुग्णालयात दाखल करणे आवश्यक आहे. नागरिकांनी स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची काळजी घेत परिसर डासमुक्त ठेवण्यासाठीही पुढाकार घ्यावा," असे आवाहन युवा क्रांती पोलिसमित्र माहिती अधिकार संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. राजेश्वर हेंद्रे यांनी केले.

'हनुमान अंश'प्रमाणे 'नमो सेवा गाथा'ही रेकॉर्ड करेल : रविंद्र चव्हाण



■ पुणे : (दै. संध्या)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभरात 'सेवा संकल्प अभियान'राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनप्रवासातील सेवाभाव, समर्पण, राष्ट्रभक्ती आणि सुशासनाची प्रेरणादायी गाथा जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

या अभियानाअंतर्गत 'नमो सेवा – अनसुनी कहानियाँ या पथनाट्य उपक्रमाचा महाराष्ट्रातील शुभारंभ मुंबईतील केसी महाविद्यालय येथे भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी पथनाट्य सादर करणाऱ्या कलाकारांचा आणि संयोजकांचा सत्कार करण्यात आला.

पंतप्रधान मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील संघर्ष, सेवाभाव, राष्ट्रनिष्ठा आणि जनसेवेचा प्रवास पथनाट्याच्या माध्यमातून प्रभावी पद्धतीने जनमानसापर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. पिंपरी-चिंचवडमधील कलाकार पथनाट्याद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग महाराष्ट्राच्या विविध भागांत सादर करणार आहेत. १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात एक मोठा प्रयोग, तर प्रत्येक विधानसभा क्षेत्रात किमान १० पथनाट्य प्रयोग आयोजित करण्यात येणार आहेत. त्यामुळे राज्यभरात मोठ्या प्रमाणावर हे पथनाट्य सादर होणार असून, नवोदित कलाकारांना या माध्यमातून जनजागृती आणि सामाजिक संदेश देण्याची संधी मिळणार आहे. "आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या चरित्रातून आपल्याला सेवाभाव, सुशासन, समर्पण आणि राष्ट्रभक्तीची शिकवण मिळते. त्यांच्या जीवनातील असे प्रेरणादायी क्षण पथनाट्याच्या माध्यमातून जनमानसात रुजविण्यासाठी 'नमो सेवा गाथा' हा स्तुत्य उपक्रम आहे. 'हनुमान अंश' या नवोदित कलाकारांच्या चित्रपटाने ज्याप्रमाणे रेकॉर्ड निर्माण केले, त्याचप्रमाणे 'नमो सेवा गाथा' हे पथनाट्य देखील रेकॉर्ड करेल" असा विश्वास यावेळी रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला. या शुभारंभ सोहळ्याला महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, विधानसभा अध्यक्ष आ. राहुल नार्वेकर, भाजपचे मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, मुंबईच्या महापौर रितू तावडे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, आ. अमित गोरखे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मळ्याळी समाजाचा रंगला सांस्कृतिक महोत्सव



■ चिखली : (दै. संध्या)

इंद्रायणी नगर भोसरी नायर सर्व्हिस सोसायटीच्या वतीने चिखली टाऊन हॉल येथे आयोजित करण्यात आलेला ओणम सांस्कृतिक महोत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंद्रायणी भोसरी नायर सर्व्हिस सोसायटीचे अध्यक्ष संतोषकुमार नायर होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अमदार महेशदादा लांडगे, नगरसेवक निलेश नेवाळे,कुंदन गायकवाड, नगरसेविका अश्विनी वाबळे,माजी नगरसेवक विलास मडीगेरी, सरस्वती विश्व विद्यालय तथा नायर सर्व्हिस सोसायटी निगडीचे अध्यक्ष विश्वनाथन नायर,वागदेवता नियतकालिकाचे संपादक वेल्लायुद्धन मरार, भाजप उपाध्यक्ष राकेश नायर, इंद्रायणी नगर भोसरी एनएसएसचे अध्यक्ष संतोषकुमार नायर, सचिव शशीद्रण नायर, खजिनदार प्रसन्नकुमार नायर, ,निर्मला नायर, जिता नायर सुजित पिल्ले, अमल पिल्ले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी दहावी/बारावीतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तिरवातिरा या परंपरिक नृत्याने सांस्कृतिक कार्यक्रमास प्रारंभ झाला.यावेळी धीरज नायर दिग्दर्शित युवकांनी लघु नाटिका,तर लहान मुलांनी नृत्य सादर केले.तर महिलांनी गरबा नृत्याने कार्यक्रमाची रंगत वाढली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिरा नायर, स्वाती नायर यांनी केले.

नॉव्हेल इंटरनॅशनल स्कूलमध्ये स्वच्छता मोहीम



■ नारायणगाव: (दै. संध्या)

राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त नॉव्हेल इंटरनॅशनल स्कूलमध्ये स्वच्छता मोहीम, जनजागृती रॅली तसेच विविध सर्जनशील व कृतीशील उपक्रम उत्साहात राबविण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय, पर्यावरण संवर्धनाची जाणीव, सामाजिक बांधिलकी, श्रमप्रतिष्ठा आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना रुजविणे हा या उपक्रमांचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात शिस्तबद्ध व प्रेरणादायी परिपाठाने झाली. यावेळी विद्यार्थ्यांना 'स्वच्छता हीच सेवा' या संकल्पनेचे महत्त्व विशद करण्यात आले. स्वच्छता ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता ती दैनंदिन जीवनशैलीचा भाग व्हावी, तसेच स्वच्छ परिसर निर्माण करण्यासाठी कुटुंब, शाळा आणि समाजाचा सामूहिक सहभाग आवश्यक आहे, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. 'स्वच्छ भारत, विकसित भारत' या संकल्पनेशी स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि जबाबदार नागरिकत्व यांचा असलेला संबंधही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आला.

या प्रसंगी नॉव्हेल ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे संस्थापक अध्यक्ष आमदार अमित गोरखे, कार्यकारी संचालक विलास जेऊरकर, विद्यालय व्यवस्थापक डॉ. प्रिया गोरखे, तांत्रिक विभाग प्रमुख समीर जेऊरकर, मुख्याध्यापिका मृदुला गायकवाड व उपमुख्याध्यापिका वैशाली हरुगडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांसोबत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध उपक्रमांसाठी मार्गदर्शन केले.

इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या वयोगटानुसार विविध सर्जनशील व कृतीशील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये चित्रकला व रंगभरण, घोषवाक्य लेखन, पोस्टरनिर्मिती आणि भित्ती सजावट यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन, सामाजिक जबाबदारी आणि निरोगी जीवनशैली यांसारख्या विषयांवर आपल्या कल्पकतेतून प्रभावी संदेश मांडले. 'स्वच्छ पाठशाळा' या संकल्पनेअंतर्गत शाळेतील वर्गखोल्या, परिसर आणि स्वच्छतागृहे स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.

'ठाणे गौरव' पुरस्काराने पुरंदरचे गणेश दरेकर सन्मानित



■ मुंबई (दै. संध्या)

ठाणे महानगरपालिकेचा (TMC) शहरातील सर्वोच्च नागरी सन्मान असलेला प्रतिष्ठेचा 'ठाणे गौरव पुरस्कार' यंदा पुरंदर सुपुत्र गणेश दरेकर यांना प्रदान करण्यात आला.

या पुरस्कार सोहळ्या करिता उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेब, खासदार नरेश म्हस्के साहेब, ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळकर, उपमहापौर कृष्णा पाटील, आमदार रवींद्र फाटक, ठाणे महानगरपालिका सभागृह नेते हनुमंत जगदाळे, गटनेते नगरसेवक पवनदादा कदम, राष्ट्रवादी काँग्रेसचे विरोधी पक्षनेते शानू पठाण, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे गटनेते अभिजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते सुहास देसाई तसेच ठाणे महानगरपालिकेतील सर्व नगरसेवकांच्या प्रमुख उपस्थितीत होते. हा सन्मान स्वीकारणे माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि अविस्मरणीय क्षण असल्याचे दरेकर यांनी सांगितले. दरेकर हे मूळचे पुरंदर तालुक्यातील जेजुरकर असून गेली कित्येक वर्ष मुबई मधून सामाजिक, राजकीय सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरथ असतात सामाजिक कार्यात त्यांचे विशेष योगदान आहे.

त्यांच्या या विशेष सन्मानाबद्दल जेजुरी नगराध्यक्ष जयदीप बारभाई, भाजपा शहर अध्यक्ष सचिन पेशवे, भाजपा जिल्हा महिला उपध्यक्षा अलका शिंदे, माजी विश्वस्त प्रमुख डॉ प्रसाद खंडागळे जेजुरी मार्तंड देवसंस्थांना ट्रस्टी पोपट खोमणे, मनसे शहर अध्यक्ष उमेश जगताप, अभिनेते विनोद शिंदे तसेच प्रतिष्ठान मित्र मंडळे इत्यादीनी अभिनंदन केले आहे